# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ५, १९४७ (शके)**

| | |
|---|---|
| (१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री<br>(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री<br>(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री<br>(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री<br>(७) वस्त्रोद्योग मंत्री<br>(८) सहकार मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

### अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) चे लाभ पात्र दिनांकापासून लागू करण्याबाबत

**(१) * ७३६३ श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) चे लाभ लागू आहेत, मात्र सदर लाभ विद्यापीठ समितीच्या परिक्षणानंतर प्रत्यक्ष मंजुरीच्या दिनांकापासून लागू करण्यात येत असून, पात्र (देय) दिनांकापासून लागू केले जात नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी दिलेल्या सूचनेनुसार, अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी दिनांक ७ ऑक्टोबर, २०२१ रोजी शासनाने समितीचे गठन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकांना CAS चे लाभ पात्र (देय) दिनांकापासून लागू करण्याबाबत शासनाने गठीत केलेल्या समितीच्या दिनांक ६ जानेवारी, २०२२ व २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या बैठकींमध्ये सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक

यांना CAS चे लाभ पात्र (देय) दिनांकापासून लागू करण्याची स्पष्ट शिफारस शासनाकडे करण्यात आली असून त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) चे लाभ लागू करण्याबाबत निर्णय शासनाने दिनांक १० मे, २०१९ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये घेतला असल्याने समितीची शिफारस अमान्य करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांकडे सोपविण्यात आलेल्या अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत

**(२) * ७३९१ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी, श्री.राजेश राठोड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक शाळांमध्ये एकाच शिक्षकांकडे दोन-तीन वर्गांची जबाबदारी असतानाही तसेच शिक्षकांकडे विविध ॲप वर माहिती भरणे, विद्यार्थी संख्या अद्ययावत करणे, यु-डायस प्लसमध्ये विषय, पदसंख्या इत्यादी माहिती भरणे या शैक्षणिक कामांसह अनेक अशैक्षणिक कामे सोपविली जात असल्यामुळे दैनंदिन अध्यापनाच्या कामावर नकारात्मक परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्ष निवडणूक कार्याशी संबंधित नसलेल्या मतदार नोंदणीसारखी महसूली कामेही शिक्षकांवर सोपविण्यात आली असून शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती, त्यासोबतच नगरपालिका व महानगरपालिका निवडणुकीदरम्यान चेक पोस्टवर नियुक्ती, तसेच मुंबईसारख्या शहरात भटक्या श्वानांची गणना करण्यासाठी नियुक्ती करण्यात येत असल्याने शिक्षकांवर या अशैक्षणिक कामाचा जास्त ताण येत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच शिक्षकांनी अध्यापनाचे नियोजन कसे करावे याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) SUO MOTO WRIT PETITION ५/२०२५ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०७/११/२०२५ रोजी भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने या व्यतिरिक्त सार्वजनिक इमारतीमध्ये स्वच्छतेबाबत सुयोग्य उपाययोजना करणे तसेच खाद्यपदार्थांची योग्य विल्हेवाट

लावण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुषंगाने विविध विभागांसहित शिक्षकांना देखील जबाबदारी देण्यात आली आहे. भटक्या श्वानांचा उपद्रव व श्वानदंशाच्या घटना विचारात घेता, एक जबाबदार नागरिक म्हणून जनजागृती होणे आवश्यक आहे.

तथापि, शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून शासन निर्णय दिनांक २३/०८/२०२४ अन्वये शैक्षणिक कामे, अशैक्षणिक कामे व आरटीई ॲक्टनुसार करावयाची अनिवार्य कामे याबाबतचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे व स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य विधीमंडळ व संसद यासाठी होणाऱ्या निवडणूकांची कामे ही अनिवार्य कामे आहेत. तसेच दिनांक २३/०८/२०२४ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. ७ मध्ये नमूद करण्यात आलेली अशैक्षणिक कामे शिक्षकांना सोपविण्यात येऊ नयेत, याबाबत इतर विभागांनी त्याच्या क्षेत्रिय कार्यालयांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्याबाबत निदेश देण्यात आले आहेत.

तसेच शिक्षकांना देण्यात येणारी शैक्षणिक व अशैक्षणिक कामे विचारात घेऊन शिक्षकांना प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा तसेच शिक्षकांची कामे सुलभ व्हावीत यासाठी सरल व युडायस प्रणालींचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. तसेच, शाळा स्तरावरील विविध समित्यांचे विलिनीकरण करुन समित्यांची संख्या देखील कमी करण्यात आलेली आहे. त्यामुळे शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची शासन दक्षता घेत आहे.

-----------------

## राज्यातील दहावी व बारावी परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी शाळांमधील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(३) * ६८२१ श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुनिल शिंदे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.संजय केणेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दहावी व बारावी परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शाळांमधील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे आणि केंद्राभोवती संरक्षक भिंत व खिडक्यांना मजबूत जाळ्या बसविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, मात्र या निर्णयामुळे खाजगी अनुदानित शाळांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे खाजगी अनुदानित शाळांना वीजपुरवठा, इंटरनेट जोडणी, सुरक्षित रेकॉर्डिंग व्यवस्था या सुविधाही आवश्यक केल्या आहेत, मात्र सदर शाळांकडे वेतनेतर अनुदान उपलब्ध नसल्याने संस्थाचालकांना प्रत्येक सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा खर्च, देखभाल आणि तांत्रिक सुविधा तसेच डीव्हीआरचा खर्च परवडणारा नसल्याने सदर खाजगी शाळांच्या संस्थाचालकांमध्ये असंतोष निर्माण झाला

असून, सीसीटीव्ही बसविण्यासाठी शासकीय निधी अथवा अनुदान द्यावे किंवा जिल्हा नियोजन समितीमधून पैसे उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी संस्थाचालकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे चौकशीच्या अनुषंगाने उक्त खाजगी अनुदानित शाळांना प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही बसविणेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) इयत्ता १० वी व इयत्ता १२ बोर्ड परीक्षांचे आयोजन कॉपीमुक्त व गुणवत्ता पूर्ण वातावरणात होण्यासाठी शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्याचे निर्देश दिले आहेत. दिनांक १३ मे, २०२५ च्या शासन निणर्यान्वये विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने शाळा व परिसरात सी.सी.टी.व्ही. बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच सदर शासन निर्णयान्वये खाजगी शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविण्याची व व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापनाची असेल असे नमुद आहे, व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा परीसरामध्ये सी.सी.टी.व्ही. बसविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत शालेय शिक्षण विभागातील योजनांसाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचा वापर करावा असे निर्देशीत केले आहे व दिनांक १३ मे, २०२५ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांन्वये शाळा स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे व विविध मुख्याध्यापक / शिक्षक महासंघ यांच्यात दिनांक १९/०१/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत या संघटनांनी परीक्षा केंद्रावरील वर्ग खोल्यांमध्ये १०० टक्के सी.सी.टी.व्ही. बसविण्याबाबत सहमती दर्शविली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलमुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सापगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील गैरप्रकारांची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत

**(४) * ७०१४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलमुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सापगाव, (ता.शहापूर, जि.ठाणे) हे महाविद्यालय चालविणाऱ्या कोटी विद्या चॅरिटेबल ट्रस्टच्या संचालकांविरोधात अभ्यासक्रम शुल्क, आर्थिक अफरातफर, शैक्षणिक गैरकारभार, बोगस शिक्षक नियुक्ती, भविष्य निर्वाह निधी (PF), संस्थेतील बांधकाम, प्रवेश व शिष्यवृत्ती आदी बाबींमधील गैरव्यवहार प्रकरणी गंभीर स्वरूपाच्या आरोपांखाली विविध कलमान्वये दिनांक २१ नोव्हेंबर, २०२३ रोजी शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हा दाखल होऊनही विद्या चॅरिटेबल ट्रस्टच्या संचालकांविरोधात अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींचे संस्थेच्या व्यवस्थापनाकडून वारंवार उल्लंघन करण्यात येत असून, मुंबई विद्यापीठ, तंत्र शिक्षण संचालनालय, शुल्क

नियामक प्राधिकरण, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच शासनातील संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने सदर संस्था व महाविद्यालयामार्फत भ्रष्टाचार सुरू असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलमुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सापगाव, (ता.शहापूर, जि.ठाणे) या महाविद्यालयाविरोधात मुंबई विद्यापीठासह विविध शासकीय विभागांनी शासनाकडे वारंवार तक्रारी केल्या असून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची तसेच पालकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत असून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अलमुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सापगाव, (ता.शहापूर, जि.ठाणे) हे महाविद्यालय चालविणाऱ्या कोटी विद्या चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक तसेच त्यांचेशी संगनमताने गैरव्यवहार करणाऱ्या मुंबई विद्यापीठ, तंत्र शिक्षण संचालनालय, शुल्क नियामक प्राधिकरण, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच शासनातील संबंधित अधिकारी या सर्व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर महाविद्यालय व संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), एकात्मिक आदिवासी प्रकल्प, शहापूर यांनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०२३ रोजी शहापूर, पोलीस ठाणे येथे अलमुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सापगाव, ता.शहापूर, जि.ठाणे या संस्थेच्या संस्थाचालकांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर एफ.आय.आर. प्रकरणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी संस्थाचालकांना जामीन मंजूर केला आहे. तसेच, सदर प्रकरणी चौकशीकरीता पोलीस निरीक्षक, शहापूर पोलीस ठाणे यांनी कळविल्यानुसार शुल्क नियामक प्राधिकरणाकडून संस्थेच्या शुल्काशी संबंधित प्रस्तावाच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर महाविद्यालयाविरोधात मुंबई विद्यापीठासह विविध शासकीय विभागाकडून कोणत्याही तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या नाहीत. परंतु, सदर संस्थेविरुध्द संस्थेतील माजी विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या शुल्काबाबतच्या तक्रारी तसेच, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्ष, संघटना, संस्थेचे माजी कर्मचारी यांनी संस्थेविरुध्द केलेल्या तक्रारी व दाखल झालेल्या एफ.आय.आर.ची प्रत शासनाने संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत संबंधित सक्षम प्राधिकरणांकडे आवश्यक कार्यवाहीकरीता पाठविल्या आहेत.त्यानुषंगाने, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम २(ब) नुसार, सदर तक्रारदार हे हितसंबंधित घटक नसल्याने, शुल्क नियामक प्राधिकरणाकडून सदर तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी देखील संबंधित तक्रारदार त्रयस्थ पक्ष असल्याने व स्टेकहोल्डर नसल्याने, सदर तक्रार प्रकरण नस्तीबध्द केल्याचे कळविले आहे. तसेच, सदर महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असल्याने, तेथील कर्मचारी वर्गाकडून प्राप्त झालेल्या संस्थेच्या

विरोधातील तक्रारींची शहानिशा करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने त्रिसदस्यीय समिती नियुक्त केली असून, तिचे कामकाज सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(५) * ७२७७ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमधील गैरव्यवहार प्रकरणी प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सात दिवसांच्या आत पणन संचालकांकडे सादर करण्याबाबत माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान पणन संचालकांनी आदेश देऊनही सदर आदेशानुसार बाजार समितीच्या चौकशीबाबत पणन संचालक कार्यालयाकडूनच विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या कार्यकाळात वाटप करण्यात आलेले स्टॉल, टपऱ्या, दुकाने, गाळे, मोकळया जागा तसेच पेट्रोल पंपांचे वाटप रद्द करण्याबाबत माननीय मंत्री महोदयांचे तसेच पणन संचालकांचे आदेश असूनही आजतागायत सदर आदेशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतील सदर गैरव्यवहारांमधील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतील गैरव्यवहाराबाबत प्राप्त तक्रारी व निवेदनांच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यासाठी पणन संचालक यांनी दिनांक १४/१०/२०२५ च्या आदेशान्वये विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करुन त्यांना ३ महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर अहवाल दिनांक २८/०२/२०२६ पर्यंत सादर करण्यास मुदतवाढ दिलेली आहे.
(२) बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या कार्यकाळात जाहीर सूचना किंवा ई-निविदा अन्वये कामांचे ठेके न देता ठरावाद्वारे दिलेल्या कामांचे ठेके रद्द करण्याची कारवाई सुरु आहे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत चालविण्यात येणारा पेट्रोल पंप तोट्यात जात असल्याने सदर पेट्रोल पंप खाजगी व्यवस्थापनास चालविण्यास देण्यात आला आहे.
(३) शासनाने दिनांक १७/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार पणन संचालक यांनी जिल्हा उपनिबंधक (ग्रामीण) पुणे यांना कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार अनाधिकृत स्टॉल बंद करण्यात आले असून अनाधिकृत बांधकामांवर दंडात्मक कारवाई करण्याची तसेच अशी बांधकामे काढून घेण्याची नोटीस देण्यात आली आहे.

पणन संचालक यांनी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीची चौकशी करण्याच्या दिलेल्या दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या आदेशाविरुध्द बाजार समितीने मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१७४७३/२०२५ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील निळवंडे कालवा प्रकल्पांतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

**(६) * ६५८९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) कालवा प्रकल्पाच्या लाभार्थी शेतकऱ्यांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी विविध मागण्यांसाठी आंदोलन केले असून, कालव्यालगतच्या रस्त्यांची दुरुस्ती करणे, 'पीडीएन (PDN)' योजनेबाबत शेतकऱ्यांना सविस्तर माहिती उपलब्ध करून देणे, कालव्याच्या ऊर्ध्व भागातील शेतकऱ्यांना पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करणे इत्यादी मागण्यांसाठी प्रशासनाने १५ दिवसांची कालमर्यादा निश्चित करूनही आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलनाच्या वेळी झालेल्या चर्चेचा तसेच प्रशासनाकडून मान्य करण्यात आलेल्या मागण्यांचा लेखी उत्तरात कोणताही उल्लेख न केल्यामुळे लाभार्थी शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, त्यांना त्यांच्या सिंचनाच्या हक्कापासून प्रत्यक्षात वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थी शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देण्यात आल्याच्या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्याअनुषंगाने आंदोलनाच्यावेळी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करून निळवंडे कालवा प्रकल्पाच्या लाभार्थ्यांना दिलासा देण्याबाबत लाभार्थ्यांसाठी कालबध्द व पारदर्शक कार्यपध्दती राबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

संगमनेर तालुक्यातील १६ गावात कालव्यालगतच्या रस्त्यांची मुरुम वापरुन दुरुस्ती करण्यात आली आहे. बंदिस्त नलिका वितरण प्रणालीच्या (PDN) प्रत्येक वितरिकेचे काम सुरु करण्यापूर्वी लाभधारक शेतकऱ्यांशी चर्चा करूनच पुढील काम करण्यात येते. तसेच, अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. निळवंडे प्रकल्पाचे सन २०२४ पासून आवर्तन देण्यात येत असून लाभक्षेत्रातील ओढे, नाले व बंधारे भरुन देण्यात येतात.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जलसंपदा विभागातील उपअभियंत्यांच्या नियुक्तीतील विलंबामुळे शासकीय निधीचा अपव्यय झाल्याबाबत

**(७) * ७०८४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक**

**ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.संजय केणेकर, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.सुनिल शिंदे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलसंपदा विभागातील ८० उपअभियंते गेल्या सहा महिन्यांपासून प्रत्यक्षात पदावर रुजू झालेले नसतानाही लाखो रुपयांचे वेतन घेत असल्याने शासनाच्या ७ ते ८ कोटी रुपयांच्या निधीचा अपव्यय झाल्याचे माहे डिसेंबर,२०२५ च्या चौथ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागातील उपअभियंत्यांच्या बदल्यांची प्रक्रिया प्रलंबित असल्यामुळे ८० हून अधिक उपअभियंत्यांची पदस्थापना करण्यात न आल्याने ते नियुक्तीच्या प्रतिक्षेत असून मागील सहा महिन्यात या अभियंत्यांच्या वेतनावर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याने सर्वसामान्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने नियुक्ती न मिळाल्यास खोळंबा रजा देण्याचा शासनाचा नियम असून, सदर नियमांचा गैरवापर करणाऱ्या संबंधितांवर व ज्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे नियुक्त्या प्रलंबित आहेत त्यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच गेल्या सहा महिन्यांपासून प्रत्यक्षात काम न करता वेतन दिलेल्या रकमेची वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) खरे नाही.

जलसंपदा विभागातील उप अभियंता संवर्गातील काही उपअभियंते प्रशासकीय कारणास्तव पदस्थापनेविना राहिले होते. दरम्यानच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचा कार्यक्रम घोषित झाल्याने राज्य निवडणूक आयोगाची आदर्श आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने पदस्थापनेविना राहिलेल्या उप अभियंत्यांना पदस्थापना देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील १५ हजाराहून अधिक मुली शाळाबाह्य असल्याबाबत

**(८) * ७५०३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर, श्री.संजय खोडके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये १५,२३५ किशोरवयीन मुली शाळाबाहय असल्याचे केंद्र शासनाच्या महिला आणि बालकल्याण विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार दिनांक ४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा मान्यता देण्याचे निकष, कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा निर्णय तसेच अनेक

गावांमध्ये शाळा घराजवळ उपलब्ध नसल्यामुळे मुलींना दुरवरच्या शाळांमध्ये शिक्षणासाठी पाठवावे लागत असल्याचा तोटा मुलींच्या शिक्षणाला मोठ्या प्रमाणावर बसत असल्याचे निरीक्षण राज्यातील शिक्षकांनी नोंदविले असल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाळाबाह्य झालेल्या अधिकाधिक मुली तसेच मुले पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

सन २०२५-२६ करीता प्रबंध पोर्टल वर ६ ते १४ वयोगटातील २४९७ शाळाबाह्य मुलांची नोंद करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचे स्तरावरून, शालेय शिक्षण विभागाबरोबरच इतर शासकीय विभागांच्या सहकार्याने, वय वर्ष ३ ते १८ वयोगटातील अनियमित, स्थलांतरित बालकांचे सर्वेक्षण करण्यात येते व त्या अंतर्गत आढळून येणारी बालके नजिकच्या नियमित शाळेत वयानुरूप दाखल करण्यात येतात.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकार अधिनियमानुसार ज्या वस्त्यांच्या नजिकच्या क्षेत्रामध्ये किंवा हद्दीच्या आत शाळा उपलब्ध नाहीत, अशा वस्त्यांमधील ६-१४ वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ मोफत वाहतूक/परिवहन सुविधा किंवा अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, अशी तरतूद आहे. तसेच, वस्ती नजीकच्या ५ कि.मी. एवढ्या अंतराच्या आत शाळा उपलब्ध नाहीत अशा वस्त्यांमधील माध्यमिक वर्गात शिक्षण घेत असणाऱ्या मुलांसाठी प्रति लाभार्थी रुपये ६००/- प्रमाणे एकूण १० महिन्यांकरीता रुपये ६०००/- केंद्र शासनाकडून प्रतिवर्षी मंजूर करण्यात येतात.

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या योजनेंतर्गत माध्यमिक स्तरातील मुलींसाठी निवासी शिक्षणाची व्यवस्था करण्यात येते.

स्थलांतरित होणाऱ्या बालकांच्या पाल्यांना मूळ ठिकाणी थांबण्यासाठी समग्र शिक्षा अंतर्गत हंगामी अनिवासी वसतिगृह ही योजना माहे ऑक्टोबर ते मार्च या सहा महिन्याच्या कालावधी करीता राबविण्यात येते.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील सर्व मुलं मुलींसाठी केंद्र तसेच राज्य सरकारकडून मोफत गणवेश पुरविण्यात येतात. तसेच शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व मध्यान्न भोजन इत्यादी लाभ देखील देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (पुणे शहर) यांनी मानीव अभिहस्तांतरण व सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी प्रक्रियेत अनियमितता केल्याबाबत

**(९) * ७१०१ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांच्यामार्फत देण्यात येणाऱ्या मानीव अभिहस्तांतरण व सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी आदेशासाठी संबंधित सोसायटी पदाधिकाऱ्यांनी लाच न दिल्यास संबंधित संस्थांविरोधात प्रतिकूल आदेश दिले जात असल्याच्या तक्रारी दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, TDR वापर करण्यात आलेल्या बांधकाम प्रकल्पांमध्ये, विशेषतः पार्करिज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पाषाण या संस्थेस मानीव अभिहस्तांतरण आदेश देताना विकासकाशी संगनमत करून केवळ प्लिंथ क्षेत्राचेच अभिहस्तांतरण करण्याचे आदेश देण्यात आले, तसेच बांधकामाच्या प्रमाणात जमीन क्षेत्र न देता सदनिकाधारकांच्या हक्कांचे उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात सुमारे अडीच लाखांहून अधिक सदनिकाधारक नागरिक इमारतींमध्ये वास्तव्यास असून अनेक ठिकाणी विकासकांकडून सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी व जमिनीचे अभिहस्तांतरण जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात येत असताना, सक्षम प्राधिकारी असलेल्या जिल्हा उपनिबंधकांकडून MOFA अधिनियम, शासन निर्णय व परिपत्रकांचा मनमानी अर्थ लावून आदेश पारित केले जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, साई व्हेलॉसिटी, मौजे बावधन बु., (ता.मुळशी, जि.पुणे) या प्रकल्पात एकूण सदनिकाधारकांपैकी ५१% सदनिकाधारकांनी संस्था नोंदणीचा अर्ज करूनही इमारतनिहाय ५१% सह्यांची अतिरिक्त अट लावून मोजक्या इमारतींचीच संस्था नोंदणी करण्यात आली, तसेच सोलासिया सोसायटी, वाघोली, पुणे या संस्थेचा मानीव अभिहस्तांतरण अर्ज कोणताही न्यायालयीन स्थगिती आदेश नसताना निकाली काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांनी त्यांच्या कार्यकाळात दिलेल्या सर्व मानीव अभिहस्तांतरण व सहकारी संस्था नोंदणी आदेशांची शासन स्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) अशा स्वरुपाच्या तक्रारी निदर्शनास आलेल्या नाहीत.
(२) हे खरे नाही.

पार्करिज सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विकासकास मंजूर लेआऊट मधील काही इमारतींचे बांधकाम अपूर्ण असून, पुणे महानगरपालिकेकडील मंजूर लेआऊट प्लॅन, त्यातील मंजूर TDR व प्रस्तावित बांधकाम विचारात घेऊन, शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, दिनांक २२/०६/२०१८ च्या धोरणातील मार्गदर्शक सूचनांनुसार, सदर संस्थेस मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांनी दिनांक २६/१२/२०२५ अन्वये दिले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.

नियोजित साई व्हेलॉसिटी फेज-२ सहकारी गृहरचना संस्था मर्या., मुळशी, पुणे या गृहनिर्माण संस्थेत सहा विंग असून, सर्व विंगची एकच संस्था नोंदणी करण्यास, काही विंगमधील सभासदांनी विरोध दर्शविल्याने, सदर संस्थेचा विंगनिहाय नोंदणी प्रस्ताव तपासून, विहित अटींची पुर्तता करण्यात आलेल्या

तीन विंगचे नोंदणी निर्देश देण्यात आले आहेत व उर्वरित विंग यांना देखील नियोजित नोंदणी प्रस्ताव दाखल करण्याची मुभा दिलेली आहे.

तसेच सोलॅसिया ई १ आणि ई २ सहकारी गृहरचना संस्था मर्या., पुणे या संस्थेचा मा.दिवाणी न्यायालय, पुणे येथील दावा क्र. १७६३/२०२२ निकाली निघाला असून, संस्थेचे नावे दिनांक १४/०८/२०२३ रोजी "कन्व्हेयन्स डीड" हवेली क्र १९ येथे अ.क्र. १६७३४/२०२३ नुसार नोंदणीकृत झालेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील लघु पाटबंधारे योजनांच्या लाभक्षेत्रातील जमिनीचे 'बिगर शेती' वर्गीकरण केल्याबाबत

**(१०) * ६९५३ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील शेती विकासाच्या दृष्टीने वाकेश्वर–तेल्हारा लघु पाटबंधारे तलावाची (ता.नागपूर) निर्मिती अमेरिकन अर्थसहाय्याने करण्यात आली असून, कान्होलीबारा, वेणा व सुराबर्डी (ता.हिंगणा) येथील लघु पाटबंधारे तलावांची निर्मिती राज्य शासनाच्या निधीतून करण्यात येऊन शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी सिंचन व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागाने पाटबंधारे विभागाची कोणतीही पूर्वकल्पना, तांत्रिक अभिप्राय अथवा विधिवत परवानगी न घेता वरील सर्व लघु पाटबंधारे योजनांच्या लाभक्षेत्रातील (Command Area) शेती जमिनीचे महसूल अभिलेखात जाहिरात न देता 'बिगर शेती (N.A.)' असे वर्गीकरण केल्यामुळे त्या क्षेत्रास सिंचन योजनेंतर्गत पाणीवाटप पूर्णतः बंद करण्यात आले असून, काही तलावांमधून केवळ मर्यादित व हंगामी स्वरूपातच पाणी सोडण्यात येत असल्याने शेतकऱ्यांच्या सिंचनहक्क व भविष्यातील कृषी उत्पन्नापासून ते वंचित झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाकेश्वर–तेल्हारा, कान्होलीबारा, वेणा व सुराबर्डी या लघु पाटबंधारे योजनांसाठी (अमेरिकन अर्थसहाय्य व राज्य शासनाचा निधी) स्वतंत्रपणे किती निधी मंजूर व प्रत्यक्ष प्राप्त झाला आहे, त्यापैकी प्रत्यक्ष खर्च किती झाला आहे तसेच प्रत्येक योजनेचे मंजूर सिंचन लाभक्षेत्र (हेक्टरमध्ये) किती आहे,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिंचन योजनांच्या लाभक्षेत्रातील जमिनीचे वर्गीकरण बदलण्यापूर्वी पाटबंधारे विभागाचा अभिप्राय अथवा परवानगी घेणे आवश्यक असतानाही अभिप्राय न घेता शेत जमिनीचे महसूल अभिलेखात जाहिरात न देता 'बिगर शेती (N.A.)' असे वर्गीकरण करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील शेती विकासाच्या दृष्टीने नागपूर तालुक्यातील वाकेश्वर, तेल्हारा व सुराबर्डी लघु पाटबंधारे तलावाची निर्मिती अमेरिकन अर्थसहाय्याने करण्यात आली आहे. तसेच कान्होलीबारा व वेणा (ता.हिंगणा) येथील लघु पाटबंधारे तलावांची निर्मिती राज्य शासनाच्या निधीतून करण्यात येवून परिसरातील शेतकऱ्यांसाठी सिंचन निर्मिती करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

बिगर शेती (N.A.) वर्गीकरण करणे जलसंपदा विभागाच्या कार्यक्षेत्रात येत नाही. तथापि, संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून लाभ क्षेत्रातील जमीन वापर फेरबदल संदर्भात जलसंपदा विभागाच्या अभिप्रायाकरीता प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांच्या बाबतीत जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक, दिनांक ०८/१०/२००७ नुसार कार्यवाही करण्यात येते.

(३) कान्होलीबारा व वेणा मध्यम प्रकल्पांची कामे राज्य शासनाच्या निधीतून करण्यात आली असून त्यासाठी अनुक्रमे १४५.६५ लक्ष व ९७.६६ लक्ष निधी मंजूर होता व मंजूर निधी खर्च करण्यात आला आहे. कान्होलीबारा प्रकल्पाचे लाभक्षेत्र ८४२४ हेक्टर असून वेणा प्रकल्पाचे लाभक्षेत्र २५०० हेक्टर आहे.

वाकेश्वर, तेल्हारा व सुराबर्डी या लघू प्रकल्पांची कामे अमेरिकन अर्थसहाय्यातून करण्यात आली असून त्यासाठी अनुक्रमे रुपये ३०.१२ लक्ष, ६२.८१ लक्ष व ८३.४८ लक्ष इतका निधी मंजूर होता व या प्रकल्पांवर अनुक्रमे रुपये १२६.४४ लक्ष, ४८.८१ लक्ष व १३९.७३ लक्ष खर्च करण्यात आला आहे. वाकेश्वर, तेल्हारा व सुराबर्डी या प्रकल्पांचे लाभक्षेत्र अनुक्रमे ५७३ हेक्टर, २०० हेक्टर व २५५ हेक्टर आहे.

(४) वाकेश्वर, कान्होलीबारा, वेणा व सुराबर्डी या प्रकल्पांतर्गत लाभधारकांच्या मागणीनुसार सिचंनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

तेल्हारा लघु सिंचन प्रकल्प सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६/०६/२००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मिहान, नागपूर यांना हस्तांतरीत करण्यात आला आहे. यास्तव चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील ३४६ कापूस खरेदी केंद्रावर नोंदणी केलेल्या पात्र शेतकऱ्यांचा कापूस हमीभावाने खरेदी करण्याबाबत

**(११) * ७२०८ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भामध्ये कापूस खरेदीकरीता ‘किसान ॲप’ वर दिनांक १८ डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण ३,३४,७६९ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून शासनामार्फत सुरू करण्यात आलेल्या ३४६ कापूस खरेदी केंद्रांद्वारे आतापर्यंत एकूण किती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कापूस खरेदीचा लाभ देण्यात आला आहे,

(२) असल्यास, ‘किसान ॲप’वर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची संख्या आणि प्रत्यक्षात हमीभावाने कापूस खरेदी केलेल्या शेतकऱ्यांची संख्या यामध्ये मोठी तफावत आढळून येत असून, या विसंगतीबाबत मा.उच्च न्यायालयाने ताशेरे ओढले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तफावतीची कारणे काय आहेत व नोंदणी केलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांचा कापूस हमीभावाने खरेदी होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) विदर्भामध्ये भारतीय कपास निगममार्फत एकूण ८९ कापूस खरेदी केंद्र उघडण्यात आली असून त्यापैकी सद्य:स्थितीत ८७ केंद्रांवर कापूस खरेदी सुरू आहे.

दिनांक ०५/०२/२०२६ पर्यंत कपास किसान ॲपवर एकूण ३,८५,७११ कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून त्यापैकी १,८६,६९५ इतक्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी किमान आधारभूत किंमतीने भारतीय कपास निगमला कापूस विक्री केला आहे.
(२) कपास किसान ॲपवर कापूस उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी व प्रमाणीकरणामध्ये तफावत ही शेतकऱ्यांनी केलेल्या दुबार नोंदणी व चुकीची नोंदणी यामुळे दिसून येत आहे.

तथापि, या विसंगतीबाबत मा.उच्च न्यायालयाने ताशेरे ओढले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली नाही.
(३) कपास किसान ॲपवर नोंदणी केलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांचा कापूस हमीभावाने खरेदी होण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

ज्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण झाले आहे अशा शेतकऱ्यांचे स्लॉट बुकींग करून किमान आधारभूत किंमतीने कापूस खरेदी सुरू आहे.

विदर्भामध्ये कापूस हंगाम २०२५-२०२६ मध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून दिनांक ०६/०२/२०२६ पर्यंत अंदाजे ५८.७१ लाख क्विंटल इतका कापूस भारतीय कपास निगमद्वारे खरेदी करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील लिंबोटी धरणाच्या कालव्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१२) * ६७८९ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील लिंबोटी धरणातून जाणाऱ्या सुमारे ५८ कि.मी. लांबीच्या कालव्यांना अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी भगदाडे पडली असून मुसळधार पावसामुळे कालव्याच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर गाळ साचला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालव्यांची दुरुस्ती व गाळ काढण्याची कामे पूर्ण केली नसल्यामुळे तसेच अतिवृष्टीमुळे पडलेली भगदाडे बुजविलेली नसल्यामुळे शेतकऱ्यांना योग्य त्या सिंचनाच्या सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लिंबोटी धरणातून जाणाऱ्या उक्त कालव्यांची दुरुस्ती व गाळ काढण्याची कामे पूर्ण करण्याबाबत तसेच अतिवृष्टीमुळे पडलेली भगदाडे बुजविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

उर्ध्व मानार (लिंबोटी) प्रकल्पास ५८ कि.मी. लांबीचा डावा कालवा असून सदर कालवा प्रामुख्याने डोंगराळ भागातून जातो. उर्ध्व मानार (लिंबोटी) प्रकल्पाच्या नांदेड जिल्ह्यातील लोहा व कंधार या तालुक्यातील लाभक्षेत्रात दिनांक २७, २८, २९ ऑगस्ट, २०२५ व दिनांक २६, २७, २८, सप्टेंबर, २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे डोंगरभागातील, माळारानातील व शेतशिवारातील पाणी व माती अनियंत्रित पध्दतीने कालव्यात आल्याने कालव्यास क्षती पोहोचून कालवा फुटून मोठ्या प्रमाणात माती भराव व त्यावरील संधानक अस्तरीकरण वाहून गेले असून कालव्यात गाळ साठलेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर कालवा दुरुस्तीचे काम जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडील संयंत्रे वापरुन तसेच सेवाभावी संस्था (NGO) यांचेकडून संयंत्रे उपलब्ध करुन घेऊन पूर्ण करण्यात आले आहे. तसेच कालव्यातील गाळ काढण्याचे काम करण्यात आले आहे.

सदर काम पूर्ण झाल्यानंतर कालवा सल्लागार समिती बैठकीतील निर्णयानुसार रब्बी हंगामातील पहिले सिंचन आवर्तन दिनांक २३/१२/२०२५ ते दिनांक १२/०१/२०२६ या कालावधीत पार पडले असून दिनांक २४/०१/२०२६ पासून दुसरे सिंचन आवर्तन सुरू करण्यात आले असून कालव्याच्या पुच्छ भागापर्यंत पाणी पोहोचले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील क्रीडा संकुलाच्या देखभाल-दुरुस्तीबाबत

**(१३) * ६६५५ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील क्रीडा संकुलातील जलतरण तलाव व टेनिस कोर्टच्या आवश्यक डागडुजी व नुतनीकरणाची कामे दीर्घकाळापासून प्रलंबित असल्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थी तसेच उदयोन्मुख खेळाडू यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेली क्रिकेट व व्हॉलीबॉलची मैदाने वारंवार खाजगी भागीदारांना भाडे तत्वावर दिली जात असल्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थी व क्रीडापटूंना नियमित सरावासाठी या मैदानांचा वापर करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे, परिणामी राज्यात नव्याने खेळाडू घडविण्याच्या प्रक्रियेला अडथळे निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी प्रत्यक्ष पाहणी केली आहे काय, तसेच सदर पाहणीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुषंगाने मुंबई विद्यापीठातील क्रीडा संकुलातील जलतरण तलाव, टेनिस कोर्ट व खेळाची मैदाने यांचे तातडीने नुतनीकरण करून विद्यार्थ्यांना व उदयोन्मुख खेळाडूंना क्रीडा सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील खेळाडूना क्रिकेट सरावासाठी अथवा स्पर्धेसाठी मैदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या व्यतिरिक्त कालावधीत मैदान उपलब्ध असल्यास भाडे तत्वावर देण्यात येते. सदर रक्कमेतून मैदानाची देखभाल केली जाते. व्हॉलीबॉल आणि क्रिकेट खेळाच्या मैदानांचा उपयोग प्रामुख्याने विद्यापीठातील खेळाडूंसाठी केला जातो.

(३) विद्यापीठाने बांधकाम समिती सदस्य, क्रीडा मंडळ तसेच बाह्या क्रीडा मंडळातील तज्ज्ञांची समिती गठीत केली. सदर समितीची बैठक दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी झाली असून, बैठकीमध्ये संरचनात्मक स्थिती, वॉटरप्रूफिंग, विद्यमान तलावाच्या मर्यादा, आंतरराष्ट्रीय मानकांची आवश्यकता, पुनर्बांधणी विरुध्द नवीन बांधकाम, नवीन बांधकाम, नवीन स्टेनलेस स्टील तलाव पर्याय, डिझाइन व MEP विचार, कार्यकारी व व्यावसायिक व्यवहार्यता, धोरणात्मक महत्व आणि समितीची पुढील पावले या मुद्यांवर चर्चा करण्यात आली. समितीने शिफारस केलेल्या बाबींचा अभ्यास करुन बांधकाम समितीच्या मान्यतेने जलतरणाचे काम मार्गी लावण्यात येईल. तसेच मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा संकुलातील टेनिस कोर्टचे दुरुस्तीचे काम लवकरच हाती घेण्यात येईल.

(४) लागू नाही.

-----------------

## वाळूज (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील पाझर तलाव क्षेत्रातील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(१४) * ६६६६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूज (जि.छत्रपती संभाजीनगर) औद्योगिक वसाहतीलगत पाटबंधारे विभागामार्फत पाझर तलावाचे बांधकाम करण्यात आले असून, सदर पाझर तलावाच्या धरण क्षेत्रात, सांडव्यावर तसेच तलाव पात्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे पाझर तलावाच्या पात्रात लक्षणीय पाणी साठा उपलब्ध झाला असून, अतिक्रमित मालमत्तांच्या परिसरात पाण्याचा प्रवाह वाढल्याने सांडवा व संरक्षण भिंतीस धोका निर्माण झाला असल्यामुळे पाझर तलावातील अतिक्रमणे तात्काळ काढून टाकावीत अशी स्थानिक नागरिक व औद्योगिक घटकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळूज (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील पाझर तलावाच्या सुरक्षिततेसाठी उक्त अतिक्रमणे निष्कासित करून सांडवा व संरक्षण भिंतींचे मजबुतीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

वाळूज (जि.छत्रपती संभाजीनगर) औद्योगिक वसाहतीलगत विभागांतर्गत घाणेगाव लघु प्रकल्प येतो. सदरील प्रकल्पाच्या धरण भिंतीलगत व सांडव्यालगत अतिक्रमण झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

घाणेगाव तलाव बांधकामासाठी व चारीसाठी संपादित असलेल्या जमिनीवरील अतिक्रमण काढण्याबाबत श्री.राहुल भोसले, लढा भूमिपुत्राचा यांनी क्षेत्रिय कार्यालयास दिनांक ०९/०९/२०२५ रोजी निवेदन दिले आहे.

(३) घाणेगाव लघु प्रकल्पावरील अतिक्रमणांच्या अनुषंगाने गट क्र. ४६ मधील एकूण ४१ अतिक्रमण धारकांना अतिक्रमण काढण्यासाठी क्षेत्रिय स्तरावरून एकूण ३ वेळेस नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. तद्नंतर सदरील नोटीस प्रकरणी मा.दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), छत्रपती संभाजीनगर यांचेकडे संबंधित अतिक्रमणधारकांनी नियमित दिवाणी दावा क्र. १०१४/२०२४ दाखल केला असून त्यानुषंगाने पुढील न्यायीक कार्यवाही क्षेत्रिय स्तरावरून चालू आहे. सांडव्याच्या दुरुस्तीच्या अनुषंगाने कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील रावणवाडी जलाशयाच्या मुख्य कालव्यातील गाळ काढून दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) * ६६२७ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावणवाडी (जि.भंडारा) जलाशयाच्या मुख्य कालव्यामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे पाण्याच्या प्रवाहास अडथळा निर्माण झाला असल्याने तसेच याबाबत पाटबंधारे विभागाकडून कोणतीही दखल न घेतल्याने संबंधित पाणी वाटप संस्थेने माहे डिसेंबर, २०२५ मध्ये स्वखर्चाने गाळ उपसण्याचे काम सुरू केले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभाग शाखा भंडारा यांना कालव्यातील गाळ उपशाबाबत सन २०२३ मध्ये निवेदन देण्यात आले असतानाही तीन वर्षांचा कालावधी उलटूनही प्रशासकीय स्तरावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे उन्हाळी धान पिकाला पुरेसे पाणी मिळत नसून, परिणामी शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यांची देखभाल, दुरुस्ती व गाळ उपसा करण्याची प्राथमिक जबाबदारी शासनाची असतानाही त्याकडे प्रशासकीय उदासीनतेमुळे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांना स्वतःच्या खर्चाने कामे करावी लागत असल्यामुळे शासनाच्या सिंचन व्यवस्थापनाच्या मूळ उद्दिष्टांवर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणात झालेली प्रशासकीय उदासीनता व दिरंगाईची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने तसेच भंडारा जिल्ह्यातील रावणवाडी जलाशयाच्या मुख्य कालव्याची तातडीने स्वच्छता करून सिंचन व्यवस्था सुरळीत करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली तसेच सदर कालव्यांची देखभाल व दुरुस्ती याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

रावणवाडी ल. पा. तलावाचे व्यवस्थापनाकरीता अंबामाता पाणी वापर संस्था दिनांक १०/०३/२०२३ अन्वये गठीत करण्यात आलेली आहे.

संबंधित पाणी वापर संस्थेने पाटबंधारे विभागामार्फत प्राप्त झालेल्या परतावा रक्कमेने कालव्यावरील स्वच्छता / झाडे झुडपी काढत असल्याचे दिनांक १७/१२/२०२५ रोजी संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांना अवगत केले.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२३-२४ मध्ये रावणवाडी प्रकल्पावर यांत्रिकी विभागामार्फत HR गेट जवळील गळती थांबवणे करीता मातीकाम सूरू असल्याने, खरीप हंगाम सुरळीतरित्या पार पाडण्याकरीता जून २०२३ मध्ये यांत्रिकी विभागाचे उपलब्ध असलेले संयंत्राद्वारे कालवा स्वच्छतेचे काम करून देण्यात आले.

तद्नंतर सन २०२४ मध्ये अंबामाता पाणी वापर संस्थेकडून म.ग्रा.रो.ह. योजनेंतर्गत रावणवाडी जलाशयाअंतर्गत येणारे वाकेश्वर कालवा नं.१ व वाकेश्वर कालवा नं.२ मधील गाळ काढण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचे निवेदन क्षेत्रिय स्तरावर प्राप्त झाले.

त्याअनुषंगाने उपविभागाचे पत्र दिनांक १४/०३/२०२४ अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले.

सदरहू प्रकल्पाच्या उपलब्ध पाणीसाठ्यानुसार खरीप व उन्हाळी हंगामात धान पिकाकरीता नियोजन केले जाते. अद्यापपावेतो शेतकऱ्यांच्या पिकांचे कुठलेही नुकसान झाले नाही. तसेच सिंचनाबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) हे खरे नाही.

गाळ उपसा करण्याचे काम यांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते.

रावणवाडी जलाशयाच्या मुख्य कालव्याची तातडीने स्वच्छता करून सिंचन व्यवस्था सुरळीत करण्यासाठी विभागीय कार्यालयाचे पत्र दिनांक १५/०१/२०२६ अन्वये यांत्रिकी विभागास त्वरीत मशीनरी पुरविणेबाबत कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने यांत्रिकी विभागामार्फत संयंत्रे पुरविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

सदर प्रकल्पाचे सिंचन योग्यरीत्या होणेकरीता कालव्याची वार्षिक देखभाल दुरूस्ती, आवश्यकतेनुसार व निधी उपलब्धतेनुसार दरवर्षी करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखलदारा (जि.अमरावती) तालुक्यातील शाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्त्या करण्याबाबत

**(१६) * ७३०३ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदारा (जि.अमरावती) या मेळघाटातील दुर्गम आदिवासी तालुक्यातील शिक्षण व्यवस्था कोलमडली असून, येथील हतरू केंद्र अंतर्गत येणाऱ्या शाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या नसल्याने या भागातील बहुतेक शाळा बंद असल्याचा आरोप स्थानिक ग्रामीण नागरिकांकडून करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागात झालेल्या शिक्षकांच्या बदल्या तसेच कंत्राटी भरती प्रक्रियेत हतरू केंद्र पूर्णतः दुर्लक्षित राहिल्यामुळे या केंद्रातील विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हतरू केंद्रातील शाळांमध्ये तातडीने शिक्षकांच्या नियुक्त्या करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) पेसा क्षेत्रातील पदभरतीबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती असल्यामुळे नियमित शिक्षक भरती प्रक्रिया बंद होती. त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून कंत्राटी पध्दतीने शिक्षक नियुक्त करण्यात आलेले आहेत.

सद्य:स्थितीत चिखलदरा तालुक्यातील हतरु या केंद्रात एकूण ८ शाळा असून मंजूर १६ शिक्षकांपैकी ८ नियमित शिक्षक व ७ कंत्राटी असे एकूण १५ शिक्षक कार्यरत आहेत. यापूर्वी हतरु आणि मारिता या २ शाळा सेवानिवृत्तीमुळे शुन्य शिक्षकी झाल्याने केंद्रातील इतर शाळांमधून शिक्षकांच्या तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक कामकाजास्तव सेवा घेण्यात आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक ११/०२/२०२६ च्या शासन निर्णयानुसार पेसा क्षेत्रातील शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रात्रशाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सेवा पूर्णवेळ करण्याबाबत

**(१७) * ६९९९ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रात्रशाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा पूर्णवेळ करण्याबाबतची तरतूद शासनाने दिनांक १७ मे २०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णयाच्या आधारे आतापर्यंत किती मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा पूर्णवेळ करण्यात आल्या असून, त्यांना त्यानुसार वेतनश्रेणी प्रदान करण्यात आली आहे याची जिल्हानिहाय माहिती काय आहे,
(३) असल्यास, रात्रशाळेतील शिक्षकांचा कार्यभार पूर्णवेळ शिक्षकांप्रमाणे होण्यासाठी रात्रशाळेचा कालावधी चार तास करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रात्रशाळेतील अजूनपर्यंत पूर्णवेळ सेवा न झालेल्या मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १७ मे २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार पूर्णवेळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १७/०५/२०१७ नुसार खाजगी अनुदानित रात्रशाळेतील मुख्याध्यापक, लिपिक व शिपाई ही पदे कार्यभारानुसार पूर्णवेळ राहतील, अशी तरतूद करण्यात आली होती.

शासन निर्णय दिनांक १७/०५/२०१७ मुद्दा क्र. १ (२) नुसार रात्र शाळेत कार्यरत शिक्षक अर्धवेळ कार्यरत म्हणून राहणार असल्याबाबतची तरतूद असून सदर शासन निर्णयामधील मुद्दा क्र.३ (३) नुसार रात्रशाळेतील माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षकांना तासिकेच्या कार्यभारानुसार आठवड्याला घड्याळी ९ तासांपेक्षा जास्त कार्यभार असल्यास नियमित पूर्णकालिक शिक्षकास अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीच्या प्रमाणात वेतनाचे लाभ महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवच्या शर्ती) नियमावली १९८१ नियम २१ टिप क्र. (४) नुसार अनुज्ञेय राहील, अशी तरतूद विहीत आहे.

(२) माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाकडून प्राप्त माहितीनुसार दिनांक १७/०५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार प्राप्त प्रस्ताव विचारात घेऊन राज्यात ३८ मुख्याध्यापक, ३७ शिक्षक व २९ शिक्षकेतर कर्मचारी यांना कार्यभारानुसार पूर्णवेळ करण्यात आलेले आहे. काही जिल्ह्यांमध्ये दिनांक १७/०५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार संबंधित संस्थेमार्फत प्रस्ताव प्राप्त न झाल्याने कार्यभारानुसार पूर्णवेळ मान्यता देण्यात आली नसल्याबाबत संबंधित प्राधिकरणांनी नमूद केले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) शासन निर्णय, दिनांक १७/०५/२०१७ चा शासन निर्णय, दिनांक ३०/०६/२०२२ अन्वये अधिक्रमित करण्यात आला आहे. तथापि, शासन निर्णय, दिनांक ३०/०६/२०२२ अन्वये विहित सुधारित रात्रशाळा धोरणातील तरतुदींसंदर्भात उक्त शासन निर्णय रद्द करण्याबाबत होत असलेली मागणी व रात्रशाळा धोरणासंदर्भात असलेले परस्पर विरोधी मतप्रवाह विचारात घेऊन, शासनाने रात्र शाळा संदर्भात सर्वंकष धोरण सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. उक्त समितीकडून लवकरच शासनास अंतिम अहवाल प्राप्त होणार असून या अहवालाच्या व त्यामधील शिफारशींच्या आधारे रात्रशाळे संदर्भात सर्वंकष धोरण सुनिश्चित करण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत वरिष्ठ लेखा लिपिक व रोखपाल / वरिष्ठ सहायक (लेखा) यांच्या वेतन/मानधन निश्चितीतील त्रुटी दूर करणेबाबत

**(१८) * ६९९० श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत असलेल्या वरिष्ठ लेखा लिपिक व रोखपाल / वरिष्ठ सहायक (लेखा) या पदांच्या वेतन/मानधन निश्चितीमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समग्र शिक्षा योजनेंतर्गत संपूर्ण राज्यात जिल्हा, महानगरपालिका व तालुका स्तरावर वरिष्ठ लेखा लिपिक व रोखपाल / वरिष्ठ सहायक (लेखा) ही पदे करार पध्दतीने कार्यरत असून आर्थिक जबाबदारी सांभाळणारी ही एकमेव पदे असतानाही त्यांना अत्यंत अल्प मानधन देण्यात येत असल्याने

वेतन/मानधन निश्चितीतील त्रुटी दूर करण्याबाबत गेल्या दहा वर्षांपासून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असूनही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे वारंवार लेखी निवेदने सादर करूनही शासन स्तरावर दखल न घेतल्यामुळे संबंधित कर्मचारी आजतागायत न्यायापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरिष्ठ लेखा लिपिक व रोखपाल / वरिष्ठ सहायक (लेखा) यांना पाचवा, सहावा व सातवा वेतन आयोग यानुसार तसेच पूर्वलक्षी प्रभावाने वेतनसंरचना लागू करण्याबाबत कार्यवाही व्हावी, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पत्राव्दारे निवेदन देऊनही अद्याप कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,चौकशीच्या अनुषंगाने वरिष्ठ लेखा लिपिक व रोखपाल / वरिष्ठ सहायक (लेखा) यांच्या वेतन/मानधन निश्चितीतील त्रुटी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) या संदर्भातील निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.
(४) समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत करार कर्मचाऱ्यांनी विविध स्तरावर कार्यरत करार कर्मचाऱ्यांच्या अर्हतेनुसार मानधन वाढीची मागणी तसेच अर्हतेनुसार वरिष्ठ पदावर नियुक्ती याबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक २३/०६/२०२५ रोजी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यकारी समितीच्या उपसमितीच्या १४ व्या बैठकीमध्ये सदर विषय सादर करण्यात आला होता.त्यामध्ये भारत सरकारचे समग्र शिक्षा अंमलबजावणी आराखडा व आर्थिक व्यवस्थापन आणि खरेदी नियमावली २०२४ तसेच, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद सेवानियमावली, १९९४ मधील तरतूदींचा अभ्यास करून सक्षम प्रशासकीय पातळीवर प्रस्ताव सादर करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

सदर कर्मचाऱ्यांच्या मानधनातील त्रुटी दूर करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाले आहे. समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात शिफारशी करण्यासाठी दिनांक २२/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीची प्रशासकीय कारणास्तव पुनर्रचना करण्यात येऊन समितीस वेळोवेळी अहवाल सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून, शासन स्तरावरून यथायोग्य कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोर्णा व विद्रुपा (जि.अकोला) नद्यांच्या निळी / लाल पूररेषा आखणीतील तांत्रिक निकष व सर्व्हेक्षणाबाबत

**(१९) * ६९८१ श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातून वाहणाऱ्या मोर्णा व विद्रुपा नद्यांच्या निळी व लाल पूररेषा आखणीसाठी जलसंपदा विभागाअंतर्गत कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, अकोला यांच्याकडून प्रथम DGPS व Drone सर्व्हेक्षण करण्यात आले असून, त्यानंतर DEM (Digital Elevation Model) पध्दतीद्वारे पुनः सर्व्हेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच प्रकल्पासाठी पुन्हा पुन्हा विविध पध्दतीने सर्व्हेक्षण करण्यामागील नेमके उद्दिष्ट काय आहे, DEM पध्दतीच्या तांत्रिक व्याख्या व मार्गदर्शक तत्त्वांनुसार सदर पध्दत या क्षेत्रात लागू होत नाही, तसेच मोर्णा व विद्रुपा नद्यांच्या पूररेषा आखणीसाठी DGPS, Drone व DEM या तिन्ही पध्दतींचा संयुक्त वापर तांत्रिकदृष्ट्या योग्य व शासनाच्या मान्य निकषांनुसार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर अभ्यास करताना २५ वर्षांत एकदा येणारा पूर, १०० वर्षांत एकदा येणारा महापूर अथवा नदीच्या वहन क्षमतेच्या किमान दीडपट वहन क्षमता विचारात घेऊन निळी व लाल पूररेषा निश्चित करण्यात आलेली नाही, तसेच सदर पूररेषा आखणी करताना कोणते तांत्रिक निकष, मार्गदर्शक तत्त्वे व शासकीय मानके विचारात घेण्यात आली आहेत,
(४) असल्यास, DGPS, Drone व DEM पध्दतीद्वारे करण्यात आलेल्या सदर सर्व्हेक्षणातील त्रुटींमुळे शासनाचा निधी व वेळेचा अपव्यय झाला असून नागरिकांची दिशाभूल झाली असून यापूर्वी चुकीच्या पध्दतीने आखण्यात आलेली निळी व लाल पूररेषा रद्द करून, प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करता स्थानिक पातळीवर चौकशी करून नव्याने व वास्तवाधिष्ठित पूररेषा आखणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

अकोला पाटबंधारे विभाग, अकोला या कार्यालयाकडून जलसंपदा विभागाच्या प्रचलित शासन परिपत्रक दिनांक ०३/०५/२०१८ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार तसेच पूररेषा निश्चितीकरीता पारंपरिक पध्दतीने आधुनिक यंत्रसामुग्री जसे DGPS वापरुन सर्वेक्षण करण्यात आले आहे. सदर प्रक्रियेत Drone सर्वेक्षणाचा वापर करण्यात आलेला नाही.

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे दिनांक ०२/११/२०२३ रोजी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या आढावा बैठकीतील निर्देशानुसार भारतीय प्रौद्योगिक संस्था (IIT), मुंबई यांसारख्या तत्सम नामांकित तृतिय पक्ष संस्थेकडून पूर रेषा नकाशे व पूर अभ्यास पडताळणी/तपासण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

दरम्यान भारतीय प्रौद्यौगिक संस्था, मुंबई यांच्या दिनांक २८/०६/२०२५ रोजीच्या ई-मेल अन्वये पूररेषा नकाशांचे जास्त प्रभावीपणे व चांगल्या चिन्हांकन करण्याकरीता DGPS/सर्वेक्षण माहितीसह बारीक रिझोल्यूशनचे DEM (Digital Elevation Model) वापरण्याबाबत सुचविले. त्यानुसार भारतीय प्रौद्यौगिक संस्था, मुंबई यांच्या मागणीनुसार, सदर नकाशांचे HECRAS फाईल मध्ये २.५० x २.५० मी. आकाराचे DEM अंतर्भुत करुन सुधारित फाईल क्षेत्रिय कार्यालयाकडून संबंधित संस्थेस तपासणीकरीता दिनांक ३१/१०/२०२५ रोजीच्या ई-मेलद्वारे सादर करण्यात आली आहे. सदर प्रक्रियेत कोणतेही पुन:सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

(३) जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०३/०५/२०१८ व महासंचालक, मेरी, नाशिक यांचे तांत्रिक परिपत्रक दिनांक १६/११/२०१५ मधील तरतुदीनुसार अकोला जिल्ह्यातून वाहणाऱ्या मोर्णा व विद्रुपा नदीचे लाल व निळी पूर रेषा नकाशे बनविण्यात आले आहेत. तसेच, केंद्रिय जल आयोगाने प्रकाशित केलेल्या उर्ध्व नर्मदा व तापी (उपक्षेत्र-३ सी) च्या सुधारित पूर प्राकलन अहवालामध्ये निर्देशित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे मोर्णा व विद्रुपा नदीचे लाल व निळी पूररेषा निश्चितीसाठी आवश्यक असलेले २५ व १०० वर्ष वारंवारितेचे पूर परिमाण परिगणित करण्यात आले आहेत.
(४) दिनांक ०३/०५/२०१८ रोजीच्या जलसंपदा विभागाच्या परिपत्रकातील तरतुदीनुसार सप्टेंबर, २०२३ मध्ये निश्चित केलेल्या मोर्णा व विद्रुपा नद्यांची निळी व लाल पूररेषेची पडताळणी करेपर्यंत स्थगिती देण्याबाबत जलसंपदा विभागाने दिनांक १०/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले आहे. तसेच जलसंपदा विभागाच्या दिनांक २२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये या नद्यांच्या पूररेषेची पडताळणी ही आय.आय.टी., मुंबई या नामांकित त्रयस्थ संस्थेकडून करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर आय.आय.टी., मुंबई यांच्या मागणीनुसार DEM (Digital Elevation Model) चा वापर करून पूर किंमतीची तपासणी /पडताळणी करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यासह राज्यातील सर्व शाळांना वर्गनिहाय शिक्षक देण्याबाबत

**(२०) * ६९०७ श्री.अरुण लाड:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) सांगली जिल्ह्यात सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात शालेय शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार ३१६ शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सुमारे १,००० विद्यार्थ्यांना पुरेशा संख्येने शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे अध्यापन व्यवस्था विस्कळीत होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अहवालानुसार राज्यात एकूण ८,१५२ एक शिक्षकी शाळा अस्तित्वात असून त्यामुळे देशपातळीवर महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरोगामी महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रातील होणारी पीछेहाट दूर करण्यासाठी सांगली जिल्ह्यासह राज्यातील सर्व शाळांना वर्गनिहाय शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी विशेष भरती मोहीम / शिक्षक पद भरती करण्याबाबत तसेच शिक्षकांचे वेतन शिक्षण विभागाच्या माध्यमातून थेट त्यांच्या खात्यावर वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) सांगली जिल्ह्यामध्ये माहे डिसेंबर, २०२५ मध्ये ५८१० पदे मंजूर असून त्यापैकी ५३३८ पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरित रिक्त पदांपैकी ३३५ शाळांवर सेवानिवृत्त कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सद्य:स्थिती सांगली जिल्ह्यामध्ये रिक्त पदाचे प्रमाण जवळपास ८ टक्के आहे. शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-२०२२ नुसार सांगली जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित/विनाअनुदानित शाळांसाठी मुलाखतीशिवाय एकूण

४५७ व मुलाखतीसह ३३१ असे एकूण ७८८ उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केलेली आहे. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ मधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-२०२२ नुसार पवित्र प्रणाली मार्फत राज्यात एकूण २३८७१ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित/विनाअनुदानित शाळांवरील रिक्त पदांवर शासन पत्र दिनांक ०७/०७/२०२३, दिनांक १५/०७/२०२३ व दिनांक ०४/११/२०२५ अन्वये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून सेवानिवृत्त शिक्षकांची नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ मधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

कंत्राटी शिक्षकांची नोंद UDISE + पोर्टलवर नोंदवण्याची सुविधा नसल्याने एकशिक्षकी शाळांची संख्या जास्त दिसून येते. तसेच सांगली जिल्ह्यातील शिक्षकांचे वेतन जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून थेट त्यांच्या खात्यावर CMP मार्फत जमा केले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) येथील काजळी सामुदायिक शेती सहकारी संस्थेच्या जमिनीची बेकायदेशीर विक्री केल्याबाबत

**(२१)** * **७७७८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) येथील काजळी सामुदायिक शेती सहकारी संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, उपाध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांनी संगनमत करुन संस्थेची (सर्व्हे क्र.७२ (क)(५) मधील २०-२७-०० हेक्टर आर चौरस मीटरची बाजारभावाप्रमाणे ६ कोटी ३९ लाख २७ हजार १०० रुपये मूल्य असलेली जमीन शासनाची पूर्व परवानगी न घेता ७० लाख रुपयांच्या कवडीमोल दराने खाजगी विकासकास विक्री करुन संस्थेचे कोटयवधी रुपयांचे आर्थिक नुकसान करुन फसवणूक केल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन विक्रीचा संपूर्ण व्यवहार कोणतीही मासिक सभा न घेता तसेच पूर्वमंजुरी व अधिकृत मान्यता न घेता परस्पर करण्यात आल्याचे काजळी सामुदायिक संस्थेच्या सन २०१६-१७ ते २०२२-२३ या कालावधीतील लेखापरीक्षण अहवालातून स्पष्ट झाले असून या प्रकरणात तत्कालीन सहाय्यक निबंधक आणि अवसायक यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन स्वत:च्या फायद्यासाठी जमिनीचे विक्री दस्त करुन दिल्याचा ठपका अहवालात ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गंभीर अपहाराबाबत जिल्हा विशेष लेखापरीक्षक आणि व्यापारी बँकेने पोलीस प्रशासनाकडे तक्रार देऊनही अद्याप दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल न होण्याची कारणे काय आहेत, तसेच पदाचा दुरुपयोग करुन कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच तत्कालीन सहाय्यक निबंधक आणि अवसायक यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करणे, त्यांच्या

मालमत्तेची चौकशी करणे तसेच बेकायदेशीररित्या विकलेली कोटयवधी रुपयांची जमीन शासनाच्या ताब्यात घेऊन ती पुन्हा संस्थेच्या मालकीची करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, सदर बाब काजळी सहकारी सामुदयिक शेती संस्था मर्या. (अवसायनात) ता.तलासरी जि.पालघर या संस्थेच्या सन २०१६-१७ ते २०२२-२३ या मुदतीचे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दिनांक २२/०७/२०२५ व विनिर्दिष्ट लेखापरिक्षण अहवाल, दिनांक २८/०७/२०२५ नुसार निर्दशनास आली आहे.

(२) लेखापरिक्षक श्रेणी-२ अधिन जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था,पालघर यांनी काजळी सहकारी सामुदयिक शेती संस्था मर्या. (अवसायनात) ता.तलासरी जि.पालघर या संस्थेच्या सन २०१६-१७ ते २०२२-२३ या मुदतीचे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दिनांक २२/०७/२०२५ व विनिर्दिष्ट लेखापरिक्षण अहवाल, दिनांक २८/०७/२०२५ रोजी सहायक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू यांचे कार्यालयास सादर केला होता.

सदर अहवालातून संस्थेच्या जमिनीची इंडेक्स (सुची) २ नुसार रुपये ६,३९,२७,१००/- इतकी किंमत असताना ७० लाख इतक्या किंमतीत संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, उपाध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांनी कोणतीही मासिक सभा,पूर्व मंजूरी न घेता परस्पर विक्री व्यवहार केल्याचे निर्दशनास आले आहे.

तसेच, तत्कालीन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, डहाणू व अवसायक तथा सहकार अधिकारी श्रेणी-१ डहाणू (सेवानिवृत्त) यांच्यावर पदाचा गैरवापर करुन विक्री दस्त करुन दिल्याचा ठपका ठेवण्यात आलेला आहे.

(३) काजळी सामुदायिक शेती सहकारी संस्था मर्या., तलासरी, जि.पालघर या संस्थेच्या जमीन विक्री प्रकरणात दोषी असलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष व तत्कालीन संचालक मंडळ, अवसायक व तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू यांच्याविरुध्द लेखापरिक्षक श्रेणी-२, पालघर यांनी पोलीस स्टेशन, तलासरी येथे दिनांक ११/०८/२०२५ रोजी फिर्याद अर्ज दाखल केलेला आहे. पंरतु अद्याप पर्यंत मा.पोलीस निरीक्षक, तलासरी यांनी सदर प्रकरणांत FIR दाखल केलेला नाही.

तसेच, संबंधित दोषी व्यक्तींवर आर्थिक नुकसानाची जबाबदारी निश्चित करुन त्याची वसुली करण्याचे अनुषंगाने सहायक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू, जि.पालघर या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसार, दिनांक १५/०१/२०२६ अन्वये प्राधिकृत चौकशी अधिकारी नियुक्त केले असून चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हापरिषदेच्या १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत पाठ्यपुस्तके दिली नसल्याबाबत

**(२२) * ७९६१ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद शाळांमध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना शासनामार्फत मोफत पाठ्यपुस्तके वितरीत करण्याची योजना अस्तित्वात असताना, प्रत्यक्षात सुमारे १०,००० विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सुरू होऊन सहा महिने उलटूनही अद्याप पाठ्यपुस्तके मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येणाऱ्या सुमारे ४५० शाळांमधून अंदाजे ६०,००० विद्यार्थी शिक्षण घेत असताना, इयत्ता १ ते ८ वी मधील अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सुरू होऊनही आवश्यक पाठ्यपुस्तके न मिळाल्यामुळे त्यांच्या अभ्यासावर प्रतिकूल परिणाम होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषद शाळांचे डिजिटलीकरण, विविध साहित्य खरेदी व अन्य उपक्रमांवर खर्च केला जात असताना, पाठ्यपुस्तकांची मागणी वेळेत शासनाकडे सादर करण्यात आली असतानाही ती मागणी प्रलंबित राहणे, उशिरा मंजुरी मिळणे किंवा वितरणात दिरंगाई होणे तसेच मूलभूत गरज असलेल्या पाठ्यपुस्तकांसाठी आवश्यक निधी व नियोजन करण्यात आले नसल्याने जिल्हा परिषद शाळांतील गरीब व वंचित घटकातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांची मूलभूत गरज असलेल्या पाठ्यपुस्तकांसाठी आवश्यक निधी व नियोजन करण्यात येऊन विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच १ ते ८ वी मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सुरू होऊन सहा महिने उलटूनही पाठयपुस्तके न पुरविणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही, तथापि, याबाबत वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये समग्र शिक्षा व पीएमश्री मोफत पाठ्यपुस्तक योजनेतंर्गत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नागपूर यांनी बालभारतीच्या ई-बालभारती पोर्टलवर नोंदविलेल्या ऑनलाईन मागणीस महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयांने दिलेल्या अंतिम मान्यतेनुसार महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) यांच्याकडून एकूण ८,७३,४५६ प्रतींचा पुरवठा नागपूर जिल्हापरिषदेस दिनांक १४ मे, २०२५ ते दिनांक ३० मे, २०२५ अखेर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सन २०२३-२४ च्या UDISE विद्यार्थी संख्येला गृहीत धरून पुस्तकांचा पुरवठा करण्यात आला आहे. तद्नंतर तालुक्याकडून प्राप्त माहितीनुसार १०४७८ इतकी पाठ्यपुस्तके कमी पडत असल्याचे निर्देशनास आल्यानंतर कमी पडणाऱ्या पाठ्यपुस्कांचे समायोजन माहे जुलै, २०२५ मध्ये करण्यात आलेले असून याबाबत कोणताही निकष पात्र विद्यार्थी पाठयपुस्तकापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही, विहित वेळेत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बनावट शालार्थ आयडीद्वारे झालेल्या बोगस शिक्षक भरती प्रक्रियेची व त्यातील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२३) * ८०३४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर, श्री.हेमंत पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागात सन २०१४ पासून बनावट शालार्थ आयडी व बनावट परवानगी पत्रांच्या आधारे बोगस भरती करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याने शासनाची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झाली असून या शिक्षक भरती व बोगस शालार्थ आयडी संदर्भातील चौकशी करण्यासाठी शासनाने एसआयटी पथकाची नियुक्ती केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातुर जिल्ह्यातील शिक्षण विभागातही १०५५ शिक्षक,कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेश, मान्यता, रोस्टर नोंदी इ. नसतानाही “ शालार्थ आयडी “ या वेतन प्रणालीचा गैरवापर करुन अधिकारी व खाजगी शिक्षण संस्था चालकांनी शेकडो कर्मचाऱ्यांच्या खात्यात नियमित वेतन जमा करुन शासनाच्या कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे तसेच मराठवाड्यातील जालना, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातही सन २०१९ पासून आतापर्यंत १० हजार ६० शिक्षकांना शालार्थ आयडीला मान्यता दिली असून कोरोना काळात शाळा बंद असताना व प्रशासकीय निर्बंध असतानाही सुमारे ४ हजार शालार्थ आयडी मंजूर झाल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भरती घोटाळयाच्या प्राथमिक चौकशीत काही अधिकारी, मध्यस्थ तसेच शाळा व्यवस्थापन दोषी आढळून आल्याने त्यांच्याविरुध्द सन २०२३–२४ दरम्यान अटक व फौजदारी कारवाई करण्यात आली असून गोंदिया जिल्ह्यातील काही शैक्षणिक संस्था, संचालक व प्रमुख व्यक्तींचा या भरती गैरव्यवहारात सहभाग असूनही त्याची चौकशी करून अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लातूर जिल्ह्यातील शिक्षण विभागाने नियमाचे उल्लघंन करुन अपात्र उमेदवारांना लाभ दिल्याचे तसेच सन २०१७ मध्ये एका शिक्षकाने राजीनामा दिल्यानंतर पुन्हा एका महिन्यांनी मुख्याध्यापक पदावर रुजू करुन शालेय प्रणालीमध्ये त्यांचे नांव दिनांक १५ जून, २०१८ मध्ये समाविष्ट केले असून शिक्षण विभाग व संस्था चालकांच्या संगनमताने बेकायदेशीर झालेल्या नियुक्तीबाबत व या प्रकरणातील कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष व सर्वकष चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (SIT / Special Investigation Team) नियुक्त करण्याची मागणी दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विशेष तपास पथकाने चौकशी पूर्ण करुन आपला अहवाल शासनास सादर केला असून अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे तसेच शिफारशींच्या अनुषंगाने बनावट शालार्थ आयडी व बनावट परवानगी पत्रांच्या आधारे बोगस शिक्षक भरती करून कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहारात सहभागी असणाऱ्या शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांसह संचालक व संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) व (६) शालेय शिक्षण विभागाअंतर्गत राज्यातील बनावट शालार्थ आयडी प्रकरणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना देण्यात आलेल्या अनियमित वैयक्तिक मान्यता, बनावट कागदपत्रांच्या आधारे बोगस भरती इ. सर्व अनियमिततांची सखोल चौकशी करण्यासाठी दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय विशेष चौकशी पथकाची (एसआयटी) नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर चौकशी पथकाकडून अद्यापही चौकशीची कार्यवाही सुरू असून याबाबतचा अंतिम अहवाल शासनास अद्यापि अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर चौकशी अहवालातील शिफारशींनुसार याप्रकरणी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## धामणगाव माध्यमिक विद्यालय (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे कार्यरत असलेल्या शिक्षकांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(२४) * ६६९२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक विद्यालय, धामणगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे कार्यरत असलेल्या काही शिक्षकांचे माहे डिसेंबर, २०१९ ते जुलै, २०२० या कालावधीतील वेतन थकीत असल्याने नाशिक पदवीधर मतदारसंघाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर थकीत वेतन तातडीने अदा करण्याची मागणी दिनांक २९ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकीत वेतनाचे प्रस्ताव वेळेत सादर न होणे, प्रशासकीय मंजुरीस विलंब होणे अथवा नियमांनुसार आवश्यक ती पडताळणी न झाल्यामुळे शासकीय निधी वितरित न करणे, परिणामी निधीच्या कार्यक्षम वापरावर परिणाम होत आहे तसेच संबंधित शिक्षकांना वेतन अदा न झाल्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्या अध्यापन कार्यावर तसेच शाळेच्या एकूण शैक्षणिक गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शाळा व्यवस्थापन, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच वेतन व भविष्य निर्वाह निधी कार्यालय यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे उक्त परिस्थिती निर्माण झाली असून, सदर प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने माध्यमिक विद्यालय, धामणगाव येथे कार्यरत असलेल्या शिक्षकांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत व भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये तसेच, वेतन अदा प्रक्रियेत सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित शाळा व्यवस्थापन, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच वेतन व भविष्य निर्वाह निधी कार्यालय यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे निर्माण झालेल्या सदर परिस्थितीस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

याबाबत नमूद करण्यात येते की, माध्यमिक विद्यालय, धामणगांव ता.इगतपुरी जि.नाशिक या शाळेतील इ.७ वी च्या वर्गावरील कार्यरत दोन उपशिक्षक पदांच्या प्लॅन ते नॉनप्लॅनच्या प्रस्तावास लेखाशीर्ष २२०२०४४२ मध्ये वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नाशिक यांनी मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडे सादर केलेला आहे. संबंधित उपशिक्षकांचे थकीत वेतन २२०२३३७९ या लेखाशिर्षाअंतर्गत कार्यरत असतानाचे आहे. सध्या सदर कर्मचाऱ्यांचे वेतन लेखाशीर्ष २२०२०४४२ मधून दिले जाते.

सद्य:स्थितीत संबंधित कर्मचारी ज्या लेखाशिर्षामधून वेतन घेत आहेत त्याच लेखाशिर्षामधून थकीत देयकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे यांनी त्यांच्या दिनांक ३०/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार एका उपशिक्षकाचे ऑनलाईन सादर केलेले थकीत देयक शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नाशिक यांनी वरीष्ठ कार्यालयास सादर केलेले असून दुसऱ्या उपशिक्षकाचे ऑनलाईन देयक संबंधित शाळेने सादर केले नसल्याने देयक ऑनलाईन सादर करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नाशिक यांनी संबंधित शाळेस सूचीत केले आहे.

(३), (४), (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाने ५५३ विद्यार्थ्यांची पीएचडी साठीची नोंदणी रद्द केल्याबाबत

**(२५) * ७८०२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठामार्फत पीएचडी करणाऱ्या ५५३ विद्यार्थ्यांची नोंदणी विद्यापीठाने रद्द केली असून प्रशासनाच्या या निर्णयाविरोधात विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त करण्यात येत असून विद्यापीठांमध्ये संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक वातावरण, पुरेसे मार्गदर्शक व प्राध्यापक, प्रशासकीय व्यवस्थेचा अभाव तसेच संशोधनासाठी आवश्यक व पुरेसा डाटा उपलब्ध नसल्याचे विद्यार्थ्यांकडून सांगण्यात येत असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पी.एच.डी हा दीर्घकालीन व बहुआयामी प्रवास असून त्यात विद्यार्थ्यांला मार्गदर्शक, प्रयोगशाळा संसाधने, विभागीय पातळीवरील प्रगती अहवाल, मंजूरी प्रक्रिया, निधी इत्यादी. अनेक घटकांचा आधार आवश्यक असतो मात्र सदर सुविधा पुरविण्यात मुंबई विद्यापीठ अपयशी ठरले असून सदरचा निर्णय विद्यापीठाने मागे घेण्याबाबत विद्यार्थीवर्गाकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मार्गदर्शकांची संख्या अपुरी असल्याने पी.एच.डी करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना योग्य वेळी मार्गदर्शन मिळाले नाही यामुळे संशोधन विषय अनेक महिने प्रलंबित राहिला तर काहींच्या प्रगती

अहवालांना प्रशासकीय यंत्रणेकडून उत्तरही दिले नाही त्यामुळे विद्यार्थ्यांची पी.एच.डी ८ ते १० वर्षे प्रलंबित असून, कोरोनामध्ये बहुतांश संशोधन थांबले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पीएचडी करणाऱ्या ५५३ विद्यार्थ्यांची रद्द केलेली पी.एच.डी नोंदणी कायम ठेवण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीनुसार नियमात न बसणाऱ्या जुन्या नोंदणी असलेल्या ६४४ पीएचडी विद्यार्थ्यांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांनुसार पीएच.डी. अभ्यासक्रमाचा कालावधी कमाल सहा वर्षांचा असून संशोधनातील प्रगतीनुसार दोन वर्षे, तसेच महिला व दिव्यांग संशोधकांना अतिरिक्त दोन वर्षांची मुदतवाढ देता येते (एकूण कमाल दहा वर्षे). विद्यापीठातील मार्गदर्शकांची संख्या अपुरी नसून मागील तीन वर्षांत ६१३ नवीन पीएच.डी. मार्गदर्शक उपलब्ध करून देण्यात आले आहेत आणि प्रवेशावेळीच विद्यार्थ्यांना मार्गदर्शक नियुक्त करण्यात येतात. निर्धारित व मुदतवाढीचा कालावधी संपल्यानंतरही संशोधनात असमाधानकारक प्रगती झालेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. कोरोना काळातही ३१९ नवीन पीएच.डी. नोंदण्या करण्यात आल्या आणि १५३ विद्यार्थ्यांचे ऑनलाइन व्हायव्हा घेऊन पदवी बहाल करण्यात आली. कलिना संकुलात संशोधन प्रशासन प्रोत्साहन कक्ष स्वतंत्रपणे कार्यरत असून सर्व प्रबंध तेथेच स्वीकारले जातात. मागील सहा वर्षांत ४२१० नोंदण्या झाल्या असून २०१८ ते २०२५ दरम्यान २,८३० विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली; त्यापैकी दिनांक १७ जानेवारी, २०२६ रोजी ६०६ विद्यार्थ्यांना पदवी बहाल करण्यात आली.
(४) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीनुसार नियमात न बसणाऱ्या जुन्या नोंदणी असलेल्या पीएचडी विद्यार्थ्यांची नोंदणी रद्द करण्यात आली असल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील युवक-युवतींसाठी उदयोन्मुख क्षेत्रातील अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत

**(२६) * ६९६३ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील युवक-युवतींना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्यासाठी पारंपारिक अभ्यासक्रमांव्यतिरिक्त कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशिन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, क्लाउड कॉम्प्युटिंग यांसारखी प्रगत डिजिटल कौशल्ये तसेच हरित ऊर्जा (Green Energy), ई-व्हेईकल तंत्रज्ञान, हाय-टेक कृषीपुरक व्यवसाय, स्टार्टअप व उद्योजकता या उद्योन्मुख क्षेत्रांतील नवीन प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नवीन अभ्यासक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) व कौशल्य विकास केंद्रांमध्ये अत्याधुनिक डिजिटल व रोबोटिक्स लॅब्स उभारण्यासाठी

शासनाने विशेष आर्थिक तरतूद केली असून सदर योजनेसाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,
(३) असल्यास, समाजातील विविध घटकांकरीता या योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आरक्षण, शुल्क सवलत अथवा विशेष प्रोत्साहन योजना राबविण्यात येणार आहे काय, तसेच दुर्गम व आदिवासी भागातील बेरोजगारांपर्यंत प्रशिक्षण पोहोचवण्यासाठी 'मोबाईल स्किल व्हॅन्स', हायब्रीड किंवा पूर्णतः ऑनलाईन प्रशिक्षण व्यवस्था उभारण्याचा शासनाचा विचार असून सदर योजनांसाठी एकूण किती निधी प्रस्तावित करण्यात आला आहे,
(४) असल्यास, प्रशिक्षण पूर्ण झालेल्या उमेदवारांना तात्काळ रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नामांकित उद्योग व कंपन्यांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत काय, तसेच पुढील पाच वर्षांत किती युवक-युवतींना रोजगारक्षम (Employable) बनविण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चित केले आहे,
(५) असल्यास, शासनाने उपरोक्त नवीन अभ्यासक्रमांच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सोलार टेक्नीशिएन, मॅकॅनिक इलेक्ट्रीक व्हेहीकल लॅबसह व्यवसाय अभ्याक्रमासाठी रुपये ५.७२ कोटी, ड्रोन टेक्नॉलॉजी लॅब व अभ्यासक्रमाकरीता रुपये ७.०० कोटी इतका निधी उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच डिजिटल लायब्ररीसाठी रुपये २ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्राव्दारे नवयुगीन अभ्यासक्रमांकरीता पहिल्या टप्प्यात रुपये ७१.०० कोटी इतका निधी उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच विविध केंद्र, राज्य व जिल्हा योजना अंतर्गत उपलब्ध निधीतून राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तांत्रिक महाविद्यालय व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्याकडे नोंदणीकृत संस्थांमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात.
(३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा दिनांक १४ मे, २०१५ च्या शासन निर्णयानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील प्रवेशासाठी आरक्षण लागू आहे. आदिवासी व दुर्गम भागात काही औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये वरील व्यवसाय तुकड्या सुरू आहेत.

डी.जी.टी.,नवी दिल्ली यांच्या भारत स्किल पोर्टलवर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील सुरू असलेले सर्व व्यवसाय अभ्यासक्रम नि:शुल्क ऑनलाईन प्रशिक्षण उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाद्वारे संलग्निता देण्यात आलेल्या संस्था या स्वयंअथसहाय्यित तत्वावरील आहेत. माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रमात प्रत्यक्ष व दृकश्राव्य माध्यमातून (Blended Mode) प्रशिक्षण देण्यात येते.
(४) रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार मेळाव्यांद्वारे नामांकित उद्योग व कंपन्यांशी समन्वय साधण्यात येत आहे. पाच वर्षांत किमान १० लाख युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम बनविण्याचे उद्दिष्ट आहे.
(५) डी.जी.टी., नवी दिल्ली यांचेकडून ११ New Age Course अंतर्गत ६९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये १२६ तुकड्यांना Green Channel द्वारे संलग्नता मिळाली असून सद्य:स्थितीत

सोलार टेक्निशियन, मोटार इलेक्ट्रिकल व्हेईकल हे व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

जिओ इन्फॉर्मेटिक्स असिस्टंट, टेक्निशियन मेकॅट्रॉनिक्स व आयओटी (स्मार्ट सिटी) आदी नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याची कार्यवाही सुरू आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नियमितपणे प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवयुग अभ्यासक्रमात अल्प कालावधीचे प्रशिक्षण देण्याकरीता STEP (Short Term Employability Program) प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ५१ हजार उमेदवारांना २४२ अभ्यासक्रमात अल्प कालावधीचे प्रशिक्षण नि:शुल्क देण्यात येत आहेत, यामध्ये ४७ नवयुग अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाद्वारे विविध क्षेत्र (sectors) जसे की कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, क्लाऊड कॉम्प्युटिंग तसेच हरित ऊर्जा (Green Energy), ई-व्हेइकल तंत्रज्ञान, हाय-टेक कृषीपुरक व्यवसाय, स्टार्टअप व उद्योजकता या उद्योन्मुख क्षेत्रांतील नवीन प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम क्षेत्रात नवयुग अभ्यासक्रम (New Age Courses) तयार केले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील हूमन सिंचन प्रकल्प अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(२७) * ७२२४ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमा नदीवर (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) प्रस्तावित हूमन सिंचन प्रकल्प सन १९८२ मध्ये अंदाजे ३३.६८ कोटी रुपये खर्च करून पूर्ण करण्याचे नियोजन असूनही सदर सिंचन प्रकल्प अद्यापही अपूर्णावस्थेत असून, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास सुमारे १६० गावे व अंदाजे ४६,००० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अंदाजे ३,२०० कोटी रुपये इतक्या निधीची आवश्यकता असून, सदर प्रकल्प सन १९८२ पासून अद्याप पर्यंत अपूर्ण असल्याने प्रकल्पाची किंमत वाढली आहे तसेच सिंचनाअभावी शेतकऱ्यांच्या उत्पादकतेवर परिणाम झाला असून शेकडो हेक्टर जमीन संपादित करुनही शेतकऱ्यांना या प्रकल्पाचे लाभ वेळीच मिळणे आवश्यक असताना संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे उक्त प्रकल्प प्रदीर्घ काळापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील उमा नदीवरील हूमन सिंचन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करुन शेतकऱ्यांना सिंचन उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पाच्या प्राथमिक कामास वर्ष १९८२-८३ पासून सुरुवात करण्यात आली. प्रकल्पाच्या

बुडित क्षेत्राकरीता व बांधकामाकरीता वनक्षेत्राची आवश्यकता आहे. तथापी वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमुळे प्रकल्पाची कामे सन १९८४-८५ पासून स्थगित आहेत.

(२) नाही, हे खरे नाही.

सदर प्रकल्पाची प्रथम प्रशासकीय मान्यता रुपये १०१६.४९ कोटी हे असून आजमितीस प्रकल्पावर रुपये २११.५६ कोटी खर्च झालेला असून त्यापैकी मुख्यत्वे तत्वत: मान्यतेच्या पत्रातील अटीनुसार वनाचे नक्त वर्तमान मुल्य (NPV) पर्यायी वनीकरण मुल्य व पाणलोट क्षेत्र उपचार इतर कामाकरीता वनविभागाकडे रुपये १८८.४० कोटी चा भरणा केलेला आहे.

सदर प्रकल्पाचे बांधकामाकरीता आवश्यक १९२५.५५ हेक्टर वनक्षेत्र वळते करण्यास केंद्र शासनाच्या दिनांक ०३/०२/२००४ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: मान्यता प्राप्त आहे. परंतु प्रकल्पाचे बांधकामास आवश्यक वनजमीनीस राज्य वन्यजीव मंडळ तसेच राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA), नवी दिल्ली यांची अंतिम मान्यता प्राप्त झाल्याशिवाय प्रकल्पाचे बांधकामास सुरुवात करता येणे शक्य नाही.

(३) राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता घेण्याबाबत प्रस्ताव मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून त्यांचे पत्र दिनांक २०/१०/२०१६ अन्वये शासनास सादर करण्यात आला.

दिनांक २४/०१/२०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीचे अनुषंगाने मुख्य अभियंता व इतर अधिकाऱ्यांनी दिनांक २५/०१/२०२० रोजी प्रत्यक्ष पर्यायी स्थळाची पाहणी करुन पर्यायी धरण स्थळ निवडण्यात आले व याबाबतचा अहवाल दिनांक ०३/०३/२०२० अन्वये प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांना सादर करण्यात आला.

शासनाचे दिनांक २८/०८/२०२० च्या पत्रान्वये काही पर्यायांबाबत सविस्तर अभिप्राय सादर करण्याचे निर्देश प्राप्त झाले. त्यानुसार महामंडळाचे पत्र दिनांक १६/१२/२०२१ अन्वये सदर प्रकल्पाचा तुलनात्मक अभ्यास शासनास सादर करण्यात आला.

मा.मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८/११/२०२३ रोजी बैठक संपन्न झाली व बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली ह्यांचे प्रकल्पाचे अनुषंगाने निर्देशित सूचनांची अंमलबजावणी केल्यास प्रकल्प आर्थिक व्यवहार्यतेत बसत नसल्यास प्रकल्प स्थगित करावा लागेल असे मा.मुख्य सचिव यांनी सूचित केले. तथापि, गोदावरी तंटा लवादानुसार, हुमन नदी प्रकल्प स्थळ हे राज्यासाठी १०० % पाणीवापराचे स्थळ असल्याने लवादानुसार वाटप झालेले पाणी वापराचे अनुषंगाने प्रकल्प फेरनियोजन अभ्यासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पीक कर्ज वाटप संथ गतीने होत असल्याबाबत

**(२८)** * **६७१७ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांचे खरीप हंगामात अतिवृष्टी व पुरामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेले असतानाही नांदेड जिल्ह्यातील विविध

बँकांकडून रब्बी हंगामासाठी पीक कर्जाचे वाटप अत्यंत संथ गतीने सुरू असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये जिल्ह्यातील बँकांनी केवळ सुमारे ६ टक्के इतकेच पीक कर्ज वितरित केले असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस रब्बी हंगामासाठी रुपये ४९ कोटी ११ लाखांचे उद्दिष्ट देण्यात आले असताना आजपर्यंत प्रत्यक्ष किती पीक कर्जाची रक्कम वितरित करण्यात आले आहे व एकूण उद्दिष्टाच्या किती टक्के पूर्तता झाली आहे,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने रब्बी हंगामासाठी पीक कर्ज वाटपाची गती वाढविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, तसेच, पीक कर्ज वितरणाचे उद्दिष्ट विहित कालावधीत पूर्ण न करणाऱ्या संबंधित बँकांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे,

नांदेड जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड व महाराष्ट्र ग्रामीण बँकेसह १२ राष्ट्रीयकृत बँका व १२ खाजगी बँका अशा एकूण २६ बँका कार्यरत आहेत. नांदेड जिल्ह्यातील बँकांना खरीप व रब्बी हंगामासाठी कर्जवाटपाचे एकूण वार्षिक उद्दिष्ट रुपये २५३२.९८ कोटी इतके आहे. त्यापैकी रब्बी हंगामाचे एकूण उद्दिष्ट रुपये ६८३.२१ कोटी इतके आहे. डिसेंबर, २०२५ अखेर नांदेड जिल्ह्यातील बँकांनी एकूण रुपये १३६०.६६ कोटी इतके कर्जवाटप केले असून ते वार्षिक उद्दिष्टाच्या ५३.७२ टक्के इतके आहे. त्यापैकी डिसेंबर, २०२५ अखेर रब्बी हंगाम कर्जवाटप हे रुपये १०८.६६ कोटी असून त्याचे उद्दिष्टाशी प्रमाण २७.३५ टक्के इतके आहे.
(२) माहे ऑक्टोबर, २०२५ अखेर नांदेड जिल्ह्यातील २६ बँकांनी एकूण खरीप कर्ज वाटप रुपये १२५२ कोटी केले असून त्याची साध्य टक्केवारी ६७.६८ इतकी आहे. तसेच ऑक्टोबर, २०२५ अखरे नांदेड जिल्ह्यातील एकूण रब्बी कर्जवाटप रुपये ४.८५ कोटी असून त्याची साध्य टक्केवारी ०.९२ इतकी आहे. तसेच रब्बी हंगामासाठी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस रुपये ४९.११ कोटी इतके कर्जवाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले असून माहे जानेवारी, २०२६ अखेर बँकेने कर्जवाटप केलेले नाही.
(३) जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिनांक ०६/०६/२०२५, दिनांक ०४/०८/२०२५ व दिनांक ३०/१२/२०२५ रोजीच्या त्रैमासिक आढावा सभेमध्ये खरीप व रब्बी पीक कर्जवाटप लक्षांकाप्रमाणे उदिष्टपुर्ती करणेसाठी सर्व बँकांना सूचना दिलेल्या आहेत.

तसेच जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी पीक कर्जवाटप उदिष्टपुर्तता करणेबाबत सर्व सहायक निबंधक व बँकेंचे अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या बाजार समिती कर रद्द करण्यासह इतर प्रलंबित मागण्यांबाबत

**(२९) * ८२०८ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीने दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे पणन मंत्री महोदयांसोबत बैठक घेऊन बाजार समिती कर (APMC Tax) रद्द करणे, अन्न व औषध प्रशासन (FDA) कायद्याची अंमलबजावणी स्थगित/शिथिल करणे तसेच एपीएमसी प्लॉट हस्तांतरण शुल्कात सुधारणा करणे अशा विविध मागण्यां केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समिती कर (Market Tax), परवाने नुतनीकरण, विविध विभागांकडील स्वतंत्र परवान्यांच्या जाचक अटी तसेच तांत्रिक व प्रशासकीय अडचणींमुळे व्यापारी व्यवहारांवर अनावश्यक आर्थिक ताण निर्माण होत असल्यामुळे राज्यातील लहान-मोठ्या व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाइन पध्दतीने परवाने जारी व नुतनीकरण करण्याच्या प्रक्रियेत होणारी दिरंगाई, प्रणालीतील त्रुटी, तसेच विविध शुल्कांमुळे व्यापाऱ्यांना वेळेवर परवाने मिळत नसल्याने शासकीय महसुलाच्या नियोजनावरही विपरीत परिणाम होत असल्याने व्यापाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने व्यापाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने बाजार समिती कर रद्द करण्याबाबत आणि इतर प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीने केलेल्या विविध मागण्याच्या अनुषंगाने दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ रोजी नागपूर येथे मा.मंत्री (पणन) यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीने केलेल्या विविध मागण्याबाबत दिनांक ०८/१२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन उचित मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाला निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनी राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) ने दिलेल्या कर्जाच्या वापराच्या अटींचे उल्लंघन केल्याबाबत

**(३०) * ८०४३ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांपैकी २४ साखर कारखान्यांनी राष्ट्रीय सहकार विकास निगमने (NCDC) दिलेल्या कर्जाच्या वापराबाबतच्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याने, राज्य शासनाने साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून पंधरा दिवसांच्या कालावधीत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय सहकार विकास निगमने दिलेल्या कर्जाच्या वापराबाबत २१ सहकारी साखर कारखान्यांकडून गंभीर स्वरूपाचे उल्लंघन झाल्याचे एन.सी.डी.सी.च्या तपासणीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने साखर आयुक्तांनी दिलेल्या अहवालानुसार कर्जाच्या वापराबाबतच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करणाऱ्या या साखर कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, खरे आहे.

राष्ट्रीय सहकार विकास निगमने महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाचा साखर कारखान्यांनी केलेला विनियोग तपासून कर्जाच्या विनियोगात उल्लंघन केलेल्या सहकारी साखर कारखान्यांबाबत तपासणी करून शासनास शिफारस करण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय दिनांक ०६/०१/२०२६ नुसार साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समितीत संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) हे सदस्य व संचालक (अर्थ), साखर आयुक्त कार्यालय हे सदस्य सचिव आहेत. समितीने २ आठवड्यात अहवाल सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

(२) होय, अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या अधिकाऱ्यांनी ३० कारखान्यांना भेटी देऊन
त्यांचा अहवाल ईमेल दिनांक २२/०९/२०२५ व पत्र दिनांक ८/१०/२०२५ नुसार शासनास सादर केला आहे. अहवालानुसार २१ कारखान्यांच्या विनियोगात गंभीर स्वरूपाचे उल्लंघन, ३ कारखान्यांच्या बाबतीत मध्यम स्वरूपाचे उल्लंघन तसेच ६ कारखान्यांच्या विनियोगात किरकोळ किंवा उल्लंघन दिसुन आले नसल्याचे नमुद केले आहे.

(३) राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांचेकडून कारखान्यांना भेटी देऊन निदर्शनास आलेल्या निरीक्षणांबाबत कारखान्यांना साखर आयुक्तालय पत्र दिनांक १७/१०/२०२५ रोजीच्या पत्राने कळवुन खुलासा मागणी करण्यात आला.

कारखान्यांकडुन प्राप्त खुलाशांवर प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाचे अभिप्राय मागविण्यात आले.

कारखाना खुलासा व प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयांचे अभिप्राय याबाबतची माहिती साखर आयुक्त कार्यालयाच्या दिनांक २२/१२/२०२५ रोजीच्या पत्राने शासनास सादर करण्यात आली आहे.

परंतु कर्जाचा विनियोग करतांना राष्ट्रीय सहकार विकास निगम यांचे अटी व दिनांक ०४/०५/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील अटींचे उल्लंघन केलेल्या साखर कारखान्यांबाबत शासन निर्णयातील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनास शिफारस करण्याकरीता साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक ०६/०१/२०२६ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## राज्यातील मराठी शाळा कमी पटसंख्येमुळे बंद होत असल्याबाबत

**(३१) * ७८०५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कमी पटसंख्येमुळे सुमारे २ हजार मराठी शाळा अडचणीत आल्या असून, त्यापैकी सुमारे ६२० शाळा बंद होणार असल्यामुळे २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याची स्थिती निर्माण झाल्यामुळे शासकीय मनुष्यबळ नियोजनात विसंगती निर्माण होऊन शासकीय निधीचा अपव्यय होत असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विभागात ७००, विदर्भात ८०० हून अधिक, पश्चिम महाराष्ट्रात ७०० हून अधिक, मराठवाड्यात ४०० तसेच उत्तर महाराष्ट्रात ३०० हून अधिक मराठी शाळा बंद होण्याच्या स्थितीत असल्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण, मातृभाषेतील शिक्षणाचा हक्क तसेच शैक्षणिक सातत्य यावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने माहे डिसेंबर, २०२५ मध्ये ६२० मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असून, त्याचा परिणाम म्हणून सुमारे ७० गावांमध्ये ‘ना शाळा, ना पाटी-पेन्सिल’ अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, तसेच मराठी शाळा वाचविण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिक्षक, विद्यार्थी व संस्था चालकांनी लाखोंच्या संख्येने मोर्चा काढून शासनास निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या विभागांमध्ये कमी पटसंख्येमुळे अडचणीत आलेल्या व बंद होण्याच्या स्थितीतील मराठी शाळांची विभागनिहाय व जिल्हानिहाय संख्या किती आहे, तसेच सदर मराठी शाळा बंद न करता त्यांचे पुनरुज्जीवन करणेबाबत तसेच ग्रामीण व दुर्गम भागातील शैक्षणिक सुविधा अबाधित ठेवण्यासाठी आणि मराठी शाळांमधील विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही /उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे. मराठी शाळा बंद करण्याचा कोणताही निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात आलेला नाही. तसे शासनाचे कोणतेही धोरण नाही. तथापि, सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोर्चा काढण्यात आल्याची बाब खरी आहे.

(४) पालकांचा कल इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाल्यांचा प्रवेश घेण्यासाठी वाढत असल्याने मागील दोन वर्षाच्या तुलनेत कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या भागातील २५५ मराठी शाळा बंद झाल्या आहेत. तथापि, कमी पटाच्या मराठी शाळा सुरु असताना शाळांचा पट वाढविणे व मराठी शाळा टिकविणे या बाबत शाळा प्रवेशोत्सव, इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप, प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पायमोजे, बुट, निपुण महाराष्ट्र, समग्र शिक्षा अभियान, स्टार्स प्रकल्प, पीएमश्री प्रकल्प, माझी शाळा सुंदर शाळा, नियतकालिक चाचण्या, शिक्षक प्रशिक्षण उपक्रम इ. उपाययोजनांची अंमलबजावणी शासनाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंगरगाव (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिक्षकांअभावी बंद असल्याबाबत

**(३२) * ६७११ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंगरगाव (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षकांच्या अभावामुळे शासकीय सुट्टी नसताना व कोणतीही पूर्वसूचना न देता शाळेला कुलूप लावण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना घरी परत जावे लागल्याची बाब दिनांक २७ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते पाचवी असे एकूण पाच वर्ग असताना केवळ एकच शिक्षक कार्यरत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने गेल्या अनेक महिन्यांपासून पालकांनी शिक्षक संख्या वाढविण्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार लेखी व तोंडी मागणी केली असतानाही शिक्षण विभागाकडून या बाबीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सदर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तात्काळ वाढीव शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) मौजे डोंगरगाव (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये २८ पटसंख्या आहे व संचमान्यतेनुसार २ शिक्षक कार्यरत होते. सदरील शाळेत सहशिक्षक रजेवर होते व नियमित मुख्याध्यापकांचा त्याच दिवशी अपघात झाला होता.त्यामुळे सदरील शाळेत दिनांक २६/१२/२०२५ व दिनांक २७/१२/२०२५ रोजी पर्यायी व्यवस्था केली होती.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.